## मा. वनमंत्री यांचा संदेश-

आपल्याला जे आवडते त्यात प्रत्यक्ष कार्य करण्याची संधी मिळाली, आणि तेच आपल्या कर्तव्य स्वरुपात समोर आले तर यासारखी आनंददायी गोष्ट नाही. चंद्रपूरमधील वनांच्या साक्षीनं मी लहानाचा मोठा झालो त्यामुळे वनांबद्दल प्रेम, आस्था मुळातच होती. महाराष्ट्र राज्याचा वनमंत्री म्हणून आता मला या वनांचे संरक्षण, संवर्धन करण्याची संधी मिळाली, नव्हे तर ते माझे कर्तव्यच असून ते माझे भाग्यच आहे.

वननीतीनुसार पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३% भू भाग वृक्षाच्छादित असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्यात सुमारे २०% वनक्षेत्र आहे. वननीतीनुसार ३३% भू भाग वृक्षाच्छादित करावयाचा असेल तर २०%वनक्षेत्राचे संरक्षण व संवर्धन करणे क्रमप्राप्त असून वनेतर क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घ्यावा लागेल याची मला व वन अधिकाऱ्यांना जाणीव आहे.

आमच्या प्रत्येक उपक्रमात “ वन- धन- जीवन ” यातील संतुलनाचाच विचार असतो. वन आहे तर “ जी-वन ” आहे याची जाणीव मनामनात रुजवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. मागील वर्षी १ जुलै, २०१६ रोजी एकाच दिवशी दोन कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प वन विभागाने लोकसहभागातून सहजपणे सिध्दीस नेला. लोकसहभागाची शक्ती मिळाल्याने आमचा उत्साह द्विगुणीत झाला आहे. याच शक्तीच्या जोरावर वृक्षाच्छादित क्षेत्र वाढविण्यासाठी आम्ही वन व वनेतर क्षेत्रावर पुढील तीन वर्षात ५० कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प केला आहे. हा संकल्प आम्ही शासकीय यंत्रणा आणि जनतेच्या सहाय्याने निश्चित पूर्ण करू अशी मला खात्री आहे.

पन्नास कोटी वृक्ष लागवडीच्या कामाची व्याप्ती पाहता मोठ्या प्रमाणात लोकसहभाग वाढविणे अपरिहार्य आहे. ही बाब विचारात घेवून आम्ही “ हरितसेना महाराष्ट्र ” ची निर्मिती केली आहे.

“ हरितसेना महाराष्ट्र ” मध्ये मोठ्या प्रमाणात सदस्य नोंदणी सुरू आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत कोणीही हरितसेनेचा सदस्य होऊ शकतो.

वनासंबंधीची अवैध घटना वन विभागाला विनाविलंब कळविणे सजग नागरिकांना सुलभ जावे तसेच सामान्य नागरिकांना वन विभागासंबंधीची माहिती विनासायास मिळावी म्हणून आम्ही “ हॅलो फॉरेस्ट १९२६ ” ही नि:शुल्क सेवा कार्यान्वित केली आहे. वन, वन्यजीव संरक्षण व संवर्धनात लोकसहभाग वाढविण्यासाठी वन विभागाने हे महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या प्रयत्नासही मोठा प्रतिसाद मिळत आहे.

जागतिक तापमान वाढ, अनियमित पाऊस व पाणी टंचाई, प्रदूषण, पर्यावरणाचा ऱ्हास यासारख्या समस्यांवर अधिकाधिक वृक्षलागवड हा एक उपाय आहे. पर्यावरणाचे प्रश्न माणसानेच निर्माण केले आहेत आणि आपल्यालाच वने वाढवून सोडवायचे आहेत.

पुढील तीन वर्षात पन्नास कोटी वृक्षलागवडीचे नियोजन वनविभागाने केले आहे. हे शिवधनुष्य वनविभाग, शासनाचे इतर विभाग आणि वृक्षप्रेमी जनतेने एकत्रीतपणे पेलायचे आहे. वसुंधरेच्या रक्षणासाठी आपण सर्व मिळून हे कार्य करू अशी मला खात्री आहे.